**प्रेसनोट दि. ०१.१२.२०२१**

पतंग यशवंत कसबे वय ६५ वर्ष खाजगी उमेदवार तहसिलदार कार्यालय तासगांव रा. मु.पो. मणेराजूरी ता.तासगांव जि. सांगली यांचे विरूध्द लाच स्विकारलेबाबत कारवाई सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे भाऊ व त्याचे मित्र यांचे विरूध्द तहसिलदार कार्यालय तासगांव येथे चाप्टर केस सुरू असून सदर चाप्टर केस मध्ये मदत करण्यासाठी कसबे यांनी तक्रारदार यांचेकडे ४०००/- रूपयाची लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.०१.१२.२०२१ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दि.०१.१२.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये कसबे यांनी चप्टर केस मध्ये मदत करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ४०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तहसिलदार कार्यालय तासगांव या ठिकाणी सापळा लावला असता पतंग यशवंत कसबे वय ६५ वर्ष खाजगी उमेदवार तहसिलदार कार्यालय तासगांव रा. मु.पो. मणेराजूरी ता.तासगांव जि. सांगली यांनी तक्रारदार यांचकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून ४०००/- रूपये स्विकारलेनंतर त्यांना पकडण्यात आले आहे.

पतंग यशवंत कसबे वय ६५ वर्ष खाजगी उमेदवार तहसिलदार कार्यालय तासगांव रा. मु.पो. मणेराजूरी ता.तासगांव जि. सांगली यांचे विरुध्द तासगांव पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री सुहास नाडगौडा, श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, श्री.प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, अविनाश सागर, भास्कर भोरे, राधिका माने, अजित पाटील, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली
सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with CamScanner